लोकमत



के. के. वाघ महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. के. एन. नांदूरकर. समवेत पदाधिकारी.

# काका- तात्या स्मृतिप्रीत्यर्थ स्पर्धेबाबत बाळासाहेब वाघ यांचे योगदान : नांदुरकर

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : कर्मवीर काकासाहेब वाघ व सहकार महर्षी माधवराव तथा तात्यासाहेब बोरस्ते अर्थात काका-तात्या यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्पर्धा सुरू करणे व पुढे सुरू ठेवणे यात बाळासाहेब वाघ यांचे मोलाचे योगदान आहे. मुला व मुलींचा आत्मविश्वास वाढावा, त्यांनी मोठे व्हावे. या उद्देशाने गेल्या ४१ वर्षांपासून ही स्पर्धा आदर्शवत सुरू आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले.

पद्मश्री देवराम वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ (गुरू) व त्यांचे शिष्य सहकार महर्षी माधवराव तथा तात्यासाहेब बोरस्ते व काकुशेठ उदेशी यांच्या स्मृती निमित्ताने ४१ व्या गुरू-शिष्य स्मृतिमाह स्पर्धेचे शुक्रवारी (दि. २) उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी मुक्तांगणचे चिटणीस प्रा. शि. क. नाठे होते. याप्रसंगी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, समन्वयक डॉ. व्ही एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, डॉ. एच. व्ही. देशमुख, प्रा. एन. जी. देवशेटे, डॉ. एन. एस. पाचपोर, प्रा. व्ही. एस. संधान, प्रा. कमलेश जाधव उपस्थित होते.

आजच्या माणसे तोडण्याच्या जगात स्पर्धा माणसे जोडण्याचे काम करत असल्याची भावना प्राचार्य भूषण कर्डिले यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. व्ही एम. सेवलीकर यांनी केले. कार्यक्रम उद्घाटनानंतर दोन गटात रांगोळी व चित्रकला स्पर्धा पार पडली. ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. एन. जी. देवशेटे यांनी मानले.